# महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ
# Maharashtra State Board Of Nursing and Paramedical Education

५ वा माळा, बॉम्बे म्युच्यल अॅनेक्स, गनबो स्ट्रीट, रेसीडेन्सी हॉटेल समोर, डी.एन.रोड, फोर्ट, मुंबई-४००००१

5th Floor,Bombay Mutual Annexe,Gunbow Street, Opp.Residency Hotel, Off.D.N.Road,Fort,Mumbai-400001

दुरध्वनी : ०२२-२२६७७९९३/९४ संकेतस्थळ: msbnpe.org ई-मेल: info@msbnpe.org/msbnpe@gmail.com

Tel.No. : 022-22677993/94 website: msbnpe.org E-mail: info@msbnpe.org/msbnpe@gmail.com


---

## सूचना

**सूचना क्र: १** **दिनांक:०१/०३/२०१८**

महाराष्ट्र राज्यशासनाच्या महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ अधिनियम, २०१३ अन्वये महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ स्थापन करण्यात आलेले आहे. सदर शिक्षण मंडळाचे कामकाज दि.०९/०२/२०१८ पासून सुरु झालेले आहे. राज्यशासनाने सदर शिक्षण मंडळाचे संचालक म्हणून डॉ. प्रविण शिनगारे, संचालक, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना नियुक्त केलेले आहे. सदर अधिनियमानुसार सदर शिक्षण मंडळाच्या नियामक परिषदेचे मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण, महाराष्ट्र राज्य हे अध्यक्ष आहेत. सदर शिक्षण मंडळास यापुढे खालील प्रमाणे कार्यवाही करण्याचे अधिकार शासनाने दिलेले आहेत.

१) महाराष्ट्र परिचर्या परिषदेतर्फे विविध शिक्षण संस्थांचे निरीक्षण करणे, संलग्नता देणे, व अनुषांगिक कामे यापुढे महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ करणार आहे.

२) महाराष्ट्र परिचर्या परिषदेतर्फे घेण्यात येणाऱ्या सर्व परिक्षा व परिक्षेसंबंधीत सर्व अनुषांगिक कामे ही यापुढे महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळातर्फे करण्यात येतील.

३) परिचारीकांची नोंदणी व नोंदणीचे नुतनीकरण व यासंबंधी इतर अनुषांगिक कामे महाराष्ट्र परिचर्या परिषदेतर्फे करण्याचे चालू राहील.

४) या अगोदर महाराष्ट्र परिचर्या परिषदेने दिलेली महाविद्यालयांची संलग्नता, त्यांचा कालावधी तसेच २०१६ पर्यंत विद्यार्थ्यांना दिलेली नोंदणी या बाबत परिषदेच्या निर्णयामध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

वरीलप्रमाणे राज्या शासनाने घेतलेल्या निर्णयाची नोंद विविध परिचर्या महाविद्यालयांचे व्यावस्थापक/प्राचार्य/अधिक्षिका, सर्व संबंधीत विदयार्थी व पालक यांनी घ्यावी. महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळाबाबतची ही माहीती मंडळाचे वेबसाईट ( संकेतस्थळ) msbnpe.org वर देण्यात आलेली आहे. सदर मंडळाचा पत्रव्यवहार Email: info@msbnpe.org/msbnpe@gmail.com वर करता येऊ शकेल. मंडळाचा पत्ता वर नमुद केलेल्या लेटर हेडवर आहे. सदरची सूचना ही सर्व संबंधीतांच्या माहीतीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी प्रसिध्दीस देण्यात येत आहे.

**संचालक**

**महाराष्ट्र शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ,मुंबई**